दिनांक :– ०९.०४.२०२१.

<u>प्रेसनोट</u>

**आरोपी लोकसेवक :– नितीन अनिल लोलगे, व्यवसाय कंत्राटी अभियंता, पंचायत समिती औंढा (नां.) रा. एनटीसी हिंगोली.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.२४.०३.२०२१ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे वडील यांचे नावे अहिल्यादेवी सिंचन विहिरीचे योजनेतून मंजूर झालेल्या विहिरीचे मस्टर काढुन देण्यासाठी पंचायत समिती, औंढा (ना.) येथील इंजिनिअर श्री लोलगे हे त्यांचेकडे २५,०००/–रू. ची लाचेची मागणी करीत असुन त्यांचेवर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यावरुन दि.२४.०३.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडतळणीमध्ये लोकसेवक लोलगे, कत्रांटी अभियंता यांनी तक्रारदार यांचे कामाकरीता तडजोडअंती १०,०००/–रु.ची लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याची तयारी दर्शवली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई वरुन आलोसे लोलगे, कंत्राटी अभियंता यांचे विरुध्द पोस्टे औंढा (ना.) येथे गुरन ६६/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यता आला आहे.

ही कामगिरी श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक श्री निलेश सुरडकर, यांनी पोह श्री विजय उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री विनोद देशमुख, श्री रुद्र कवाडे, श्री तानाजी मुंढे, पोशि श्री प्रमोद थोरात, श्री अवि किर्तनकार, चापोना श्री सरनाईक यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.१०६४,** दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,
श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, लाप्रवि नांदेड.
मोबाईल कमांक. ८८८८८४१९६५, दुरध्वनी क ०२४६२–२५५८११.
मोबाईल कमांक ९८२२२००९५९.

निलेश सुरडकर
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली.